महाराष्ट्र टाइम्स, बुधवार, २५ मे, २०११, पृष्ठ क्र. ८



# संकेतचे अवकाश कुतूहल

लहानपणापासून चंद्र, तारे, आकाश पाहण्याची आवड असणारा संकेत सायन्ससारख्या विषयात विशेष रमतो. संकेत कांबळे, एनसीएल इंग्रजी माध्यम शाळेत आठवीत आहे. लहानपणापासून अवकाशाविषयी कुतूहल असल्याने त्याने आत्तापर्यंत चांद्रयान, इलेक्ट्रिसिटी प्लांट, सोलर सिस्टीम असे विविध प्रोजेक्ट बनविले आहेत. तसेच विविध ठिकाणच्या स्पर्धेतून भाग घेतला आहे. नुकतेच त्याने आयुकामध्ये तसेच मुंबईला सह्याद्री भवन येथे झालेल्या विज्ञान प्रदर्शनात भाग घेतला होता. यावेळी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी संकेतने बनवलेल्या सोलर सिस्टीमचे कौतुक केले. अशा प्रकारचे प्रोजेक्ट संकेत पाच-सहा वर्षांपासून करतो. त्याला या कामी त्याचे वडील, शाळेच्या मुख्याध्यापिका अलका पाध्ये, शिक्षिका अश्विनी शिलेदार मदत करतात. विविध वाहिन्यांवरील अवकाशासंबंधीच्या मालिका पाहून त्याला अशा कल्पना सुचतात, असेही त्याने सांगितले.




...शाळांमधील घटना-घडामोडींचं शेड्यूल कसं ठरलेलं असतं. प्रत्येक शाळेत काही ना काही घडत असतं. या खेरीज शैक्षणिक आघाडीवरही तेथील विद्यार्थी चमकत असतात. गॅदरींगपासून स्पर्धांपर्यंत आणि विविध परीक्षांतील यशापासून शिक्षकांना मिळालेल्या बक्षिसांपर्यंत विविध घटनांची नोंद घेण्यासाठी हे व्यासपीठ. तुमच्या शाळेबद्दलच्या बातम्या आमच्याकडे पाठवा.

पत्ता : महाराष्ट्र टाइम्स, अमृत चेंबर्स, दुसरा मजला, १२१६/७, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे ४११००४.

फॅक्स : ०२०-३०११७५००.